**प्रेसनोट** दि.२९/०५/२०१९

**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.**

**"रस्त्यात बेवारस सापडलेल्या लॅपटॉपला दत्तवाडी पोलीसांनी मिळवुन दिला मालक"**

तंत्रज्ञानाच्या युगात विज्ञानाने अनेक नवनवीन शोध लावले आहेत. मानवाच्या जीवनाला सुखद बनविण्यात या शोधाचा सिंहाचा वाटा आहे. त्या लागलेल्या शोधा पैकी संगणक हा विज्ञानाचा अविष्कार आहे. प्रत्येक माणसाचे जीवन कुठल्या नाकुठल्या स्वरुपात संगणकाशी जोडले आहे. त्याच संगणकाला दैनंदिन वापरण्यास सुयोग्य करण्यासाठी त्याचे लॅपटॉपमध्ये रुपांतर करण्यात शास्त्रज्ञांना यश आल्यावर प्रत्येक व्यक्ती स्वतःकडे लॅपटॉप ठेवुन लागला आहे. या लॅपटॉपला व्यावसायिक, महाविद्यालयीन व इतर क्षेत्रात अनन्य साधारण महत्व निर्माण झाल्याने त्याची किंमत सुध्दा अनमोल आहे आणितोच लॅपटॉप जर हरवला तर बेचैन होण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो.

दि.२७/०५/२०१९ रोजर सायंकाळी पुणे सातारा रस्त्यावर आदिनाथ सोसायटी समोर वर्दळीच्या वेळेस एकादुचाकी स्वाराच्या पाठीमागे बांधलेली बॅग रस्त्यावर पडली. त्याबाबत तो दुचाकीस्वार अनभिज्ञ असल्याने तसाच पुढे निघुन गेला त्याच्या पाठिमागुन आलेल्या वाहन चालकाने तो रस्त्यावर बेवारस पडलेला एचपी कंपनीचा लॅपटॉप उचलुन दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे आणुन जमा केला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार श्रीकांत शिरोळे यांनी लॅपटॉप मधील माहिती पोलीस कॉन्स्टेबल महेश गिरी यांच्या मदतीने उघडण्याचा प्रयत्न केला परंतु लॅपटॉपला सिक्युरिटी लॉक असलनेते शक्य झाले नाही. लॅपटॉप बॅगमधील मिळालेल्या एका पेनड्राईव्ह मधील माहितीच्या आधारे मनोज शास्त्री नावाच्या व्यक्तीचा तो लॅपटॉप असल्याचे लक्षात आल्यावर त्यांना ही गोष्ट सांगण्यात आली व तुमचा लॅपटॉप सुरक्षित असल्याची खात्री देण्यात आली.त्यांच्याकडुन असे समजले कि, एका खाजगी कंपनीकडे तो दुरूस्तकरण्यासाठी त्यांनी दिला होता व त्यांच्याकडे काम करणारा संगणक अभियंता तेजस मोहिते रा.कात्रज पुणे यांच्याकडुन तो रस्त्यात पडला आहे. त्याप्रमाणे रस्त्यात पडलेला बेवारस लॅपटॉप संगणक अभियंता तेजस मोहिते यांच्याकडे मुळ मालक मनाुज शास्त्री यांच्या सांगण्यावरुन देण्यात आला.

तेजस मोहिते यांनी पोलीसांनी अत्यंत तत्परतेने बेवारस पडलेल्या लॅपटॉपला सिक्युरिटी लॉक असताना त्याचा मुळ मालक शोधुनतो पुन्हा सुरक्षित ताब्यात दिल्याबद्दल समधान व्यक्त केले आहे.या कारवाई मध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्रीकांत शिरोळे व पोलीस कॉन्स्टेबल महेश गिरी यांनी सहभाग घेतला होता.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पो.स्टे. पुणे शहर